# प्रेस नोट

कोथरुड पोलीस ठाण्याचे परिक्षेत्रामध्ये दिनांक ३०/९/२०१७ रोजी राकेश परशुराम वाकडे वय १६ वर्षे रा. साईनाथ वसाहत स्मशानभुमीजवळ कैलास मित्रमंडळा जवळ शास्त्रीनगर कोथरुड पुणे यांना आरोपी नामे १. गणेश सतिश रणखांब वय २५ वर्ष रा. साईनाथ वसाहत, शास्त्रीनगर, कोथरूड पुणे २.अमोल रघुनाथ गायकवाड वय २६ वर्ष रा. साईनाथ वसाहत, शास्त्रीनगर कोथरूड पुणे ३. विजय राजु हुबळीकर रा. शिवतारा बिल्डींग गणंजय सोसायटी कोथरुड पुणे ४. बबन बाबुराव दांडगे रा.. साईनाथ वसाहत शास्त्रीनगर कोथरुड पुणे किरकोळ कारणावरुन तलवारीने वार करुन त्यांना जबर जखमी केले. तसेच सागर सर्वगौड याची आत्या रमाबाई कांबळे हीचे डोक्यामध्ये अमोल गायकवाड याने दगड मारुन गंभीर जखमी करुन त्यांना जीवे मारणेचा प्रयत्न केला याबाबत कोथरुड पो स्टे गु र नं ३६८/२०१७ भा दं वि क ३०७, ३२३, ५०४, ५०६, ३४,महाराष्ट्र पोलीस कायदा सन १९५१ चे कलम ३७(१) सह १३५, भारतीय हत्यार कायदा ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

दाखल गुन्हयामध्ये अटक आरोपी गणेश सतिश रणखांब व इतर हे कोथरुड पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील गुन्हेगार असुन त्यांचे विरुध्द यापुर्वी सुध्दा खुन, जबरी चोरी , गंभीर स्वरुपाची दुखापत करणे, शस्त्र जवळ बाळगणे वगैरे सारखे गुन्हे दाखल आहेत. त्यांनी कोथरुड पोलीस ठाण्याचे परिक्षेत्रामध्ये एक संघटीत टोळी निर्माण केलेली असुन त्या संघटीत टोळीची मोठया प्रमाणावर दहशत आहे असे चौकशीमध्ये निष्पन्न झाले. त्यामुळे श्री रघुनाथ फुगे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोथरुड पोलीस ठाणे पुणे शहर यांनी महाराष्ट्र राज्य संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ मधील कलम २३(१) (अ) प्रमाणे सदर कायद्यामधील कलम कलम ३(१)( ),३(२),३(४) यांचा अंतर्भाव करणेकामी मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे श्री रविंद्र सेनगावकर साहेब यांचेकडे प्रस्ताव पाठविला होता. त्याप्रमाणे मा. अपर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे शहर यांनी महाराष्ट्र राज्य संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ मधील कलम २३(१) (अ) प्रमाणे सदर कायद्यामधील कलम कलम ३(१)( ),३(२),३(४) यांचा अंतर्भाव करणेकामी दिनांक २५/१०/२०१७ रोजी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार वरील नमुद गुन्हयातील आरोपी नामे १. गणेश सतिश रणखांब वय २५ वर्ष रा. साईनाथ वसाहत, शास्त्रीनगर, कोथरूड पुणे २.अमोल रघुनाथ गायकवाड वय २६ वर्ष रा. साईनाथ वसाहत, शास्त्रीनगर कोथरूड पुणे ३. विजय राजु हुबळीकर रा. शिवतारा बिल्डींग गणंजय सोसायटी कोथरुड पुणे ४. बबन बाबुराव दांडगे रा. साईनाथ वसाहत शास्त्रीनगर कोथरुड पुणे यांचे विरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे. या कामी कोथरुड पोलीस ठाण्याकडील पोलीस उप निरीक्षक दिगंबर जाखडे, महेश वाघमारे पो हवा १३२१ माने, पो हवा ८४३ आवाळे, पो शि ३३८३ भिलारे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोथरुड पो स्टे पुणे यांना मदत केलेली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मा. अपर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे यांचे आदेशाने मा. सहायक पोलीस आयुक्त डेक्कन विभाग पुणे श्री नाईक साहेब हे करीत आहेत.